

# दर्पण

**महाराष्ट्र मंडळ ऑफ साऊथ फ्लोरिडा कार्यकारिणी (२०२०-२१)**

**अध्यक्ष**
मंजुषा नाईक

**उपाध्यक्ष**
नीला इनामदार

**खजिनदार**
घनेश कुलकर्णी

**सांस्कृतिक विभाग**
अनिकेत वस्त
राधिका चिकणे
सोनाली भारती

**भोजन समिती**
मकरंद जोशी
योगेश जोग
योगेश खरे
रश्मी तेलावणे

## अनुक्रमणिका


संपादकीय ........ 1
सभासद नोंदणी माहिती ........ 2
२०२१ आगामी कार्यक्रम........ 3
२०२० आढावा ........ 4
मुलाखत केळुस्कर........ 7


## नमस्कार मंडळी,

ह्या वर्षी दर्पण ह्या अंकाची नव्याने सुरुवात करतांना आम्हाला खूप आनंद होतो आहे. आपले मंडळ सुरु झाले तेव्हा दर्पणचा अंक २००९ पासून २०१६ पर्यंत दर महिन्याला ऑनलाईन येत होता. आता परत वर्षातून ४ वेळा दर तीन महिन्यांनी दर्पण तुमच्या भेटीला येईल. तुम्ही कथा, कविता, प्रवासवर्णन, मुलाखती, पाककृती, आपल्या समाजातील उल्लेखनीय व्यक्तींची माहिती किंवा लहान मुलांचे लिखाण दर्पणसाठी जरूर पाठवा. मराठी किंवा इंग्लिशमध्येही चालेल. तुमच्या भरघोस प्रतिसादाची वाट बघत आहोत. फक्त मंडळाच्या सभासदांचे साहित्य स्वीकारले जाईल. तुमचे साहित्य खालील ई-मेल वर पाठवा.
Manjusha Naik - President@mmosf.org

गेले वर्ष न भूतो न भविष्यती असेच गेले. गेल्या फेब्रुवारीपासून कोरोना व्हायरसच्या संकटाने सगळ्या जगात धुमाकूळ घातला. लाखो लोक मृत्युमुखी पडले, किती लोक बेकार झाले, प्रवास करणे धोक्याचे झाले आणि सगळ्या जगाचे व्यवहार ठप्प झाले. आपल्या मित्रमंडळींना भेटणे, बाहेर नाटक, सिनेमा बघणे, स्पोर्टस बघणे, रेस्टोरंटमध्ये जेवणे ह्या आपण गृहीत धरलेल्या साध्या साध्या गोष्टीही अशक्य झाल्या. अशा परिस्थितीत आपल्या मंडळाचे कार्यक्रम नेहेमीप्रमाणे भेटून करणे शक्य नव्हते. तरीह आपल्या उत्साही अध्यक्षा मंजुषा नाईक आणि तिच्या समितीने खूप प्रयत्न करून विविध प्रकारचे Virtual कार्यक्रम सादर केले. त्या सर्वांचे खूप अभिनंदन!

कोरोनाच्या संकटातून डॉक्टर्स आणि नर्सेस ह्यांनी अथक परीश्रम करून हजारो लोकांचे प्राण वाचवले. काही चांगल्या गोष्टीही घडल्या. पुष्कळ लोकांना घरून काम करता आल्याने लहान मुलांना त्यांच्या आई वडिलांचा सहवास मिळाला. आणि आधी स्वयंपाकघरात न फिरकणारे लोक चक्क नवीन पदार्थ करायला आणि घरकामात मदत करायला शिकले! ह्या कठीण परिस्थितीत अमेरिकेत लोकांनी अभूतपूर्व संख्येने मतदान करून नवीन राष्ट्राध्यक्ष निवडला. आणि जगभरातल्या शास्त्रज्ञांनी अशक्य वाटणाऱ्या वेळात कोरोनासाठी नवीन लस तयार केली.



**महाराष्ट्र मंडळ ऑफ साऊथ फ्लोरिडा वृत्त ‘दर्पण’**

**संपादक मंडळ**

मंजुषा नाईक



सुजाता साठे



नीला इनामदार



**मांडणी/सजावट**
राधिका चिकणे



कुसुमाग्रजांनी म्हटले आहे 'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल'. त्याप्रमाणे कोरोनाची ही नवीन लस आल्यामुळे सर्वांना पुढचे वर्ष चांगले जाईल अशी आशा वाटते आहे. या वर्षीही सर्वांनी मंडळाचे वर्गणीदार व्हावे अशी तुम्हाला नम्र विनंती. त्यामुळे नवीन दर्जेदार कार्यक्रम आणता येतील. सविस्तर माहिती पुढे दिली आहे.
सर्वांना नवीन वर्ष सुखाचे, शांतीचे व आरोग्यदायी जावो ही शुभेच्छा!

ॐ सर्वे भवन्तु सुखिनः
सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥



Meaning
1: Om, May All be Happy.
2: May All be Free from Illness.
3: May All See what is Auspicious.
4: May no one Suffer.
5: Om Peace, Peace, Peace.

## Membership Details

Membership is for the calendar year (January to December) 2021.
You can pay the membership by Check *(make payable to MMOSF)* or online by Paypal (visit mmosf.org).
*Please download, print and fill the **Membership Form** and either email to treasurer@mmosf.org or mail it with your payment OR contact any committee member to become a member. Payments are accepted only in form of Checks when mailed along with the membership forms. Payments in person are accepted in form of Cash or Check. Please do not mail cash with the membership form. We also accept online payments through Pay Pal.*

| | |
|---|---|
| Family | $50 ( Includes kids below 18 yrs.) |
| Single | $30 |
| Student (up to 30 yrs.) | $25 (All member events included in membership fee) |
| Parents | Event charges per membership status |

***Patron Membership***

| | |
|---|---|
| ***Patron*** | ***$5000*** |

## 2021 Attractions Specially for Members



Antakshari with a Twist




Master Chef for Kids



Opportunity to Publish in



Free Varli Painting Session



Free Yoga Session
On International Yoga Day



Entertainment for 55+ community
Through Uttararang Initiative



2 Free Online Programs

**and much much more…**



# २०२० आढावा

नीला इनामदार



***जानेवारी २६, २०२०***

प्रथमच मंडळात थिएट्रिक्स न्यू जर्सी चे मकरंद भावे नि विदुला मुणगेकर यांचे "अंतराय" नाट्य अभिवाचन झाले. संक्रांत हळदीकुंकू, पतंग उडविणे हा कार्यक्रम झाला. मुलां बरोबर पालकांनी पण पतंग उडवण्याची मजा घेतली. तसेच फोटो बूथहि ठेवला होता.



***मे २, २०२०***

पहिलाच virtual कार्यक्रम. महाराष्ट्र दिनानिमित्त श्री.सचिन पिळगांवकर व श्री.अरुण नलावडे यांनी व्हिडीयो द्वारे सुरेख संदेश पाठविलेत. मुले आणि मोठ्यानी महाराष्ट्र दिनाची गाणी म्हटलीत.

***जून १, २०२०***

दुसऱ्या virtual YouTube कार्यक्रमात ऊखाणे, चित्रकला, मुलांची, मोठ्यांची गाणी इत्यादी कार्यक्रम तसेच रत्नाकर मतकरींना मंडळातर्फे श्रद्धांजली देण्यात आली.







***जून २१, २०२०***

Father's Day Master Chef competition.
पाककृतींचे विडिओ बघून श्री राजेश सुर्वे हे बहूमताने विजयी ठरले.





***<u>जुलै ५,२०२०</u>***

(Virtual program) "मी मुक्त मुक्त मुक्ताई" सादरकर्त्या सौ. प्राची गडकरी. खास आषाढी एकादशी व गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने हा कार्यक्रम सादर केला.

***<u>जुलै १८, २०२०</u>***

(Virtual program) "हसगत" दिलीप प्रभावळकर लिखित २ कथांचे द्रुकश्राव्य सादर केले. हा कार्यक्रम मुंबईहून केला होता.

***<u>ऑगस्ट २,२०२०</u>***


(virtual program) "गुण गाईन आवडी" पु ल देशपांडेच्या वाऱ्यावरची वरात मधील साक्ष, व्यक्ती आणि वली मधील बबडू चे पात्र श्री. अरुण नलावडे यांनी आपल्या अभिवाचनातर्फे सादर केले.


***<u>ऑगस्ट ८,२०२०</u>***

(Virtual program) शांताबाईंच्या कविता, आत्माचरित्रात्मक लिखाण गाणी अशा बहुविध अभिव्यक्तीवर आधारित "एक होत्या शांताबाई" हा कार्यक्रम श्री मिलिंद ओक यांनी सादर केला.

***<u>ऑगस्ट १०,२०२०--ऑगस्ट २६, २०२०</u>***

(Virtual) Ronit Shahane conducted Hip Hop Fusion Dance classes for kids.



***<u>ऑगस्ट २९, २०२०</u>***

(Virtual) "मोगरा" लाईव नेटक वंदना गुप्ते, स्पृहा जोशी, भार्गवी चिरमुले,गौरी देशपांडे, मयूरा रानडे,
वेगवेगळ्या काळातल्या स्रीयांच्या व्यथा, अडचणी,
स्रीया कश्या दिव्यातून गेल्या हे सादर केले




**_सप्टेंबर १, २०२०_**

(Virtual) Ganesh and Gauri Darshan Video दरवर्षी मोठ्या प्रमाणात मंडळातर्फे गणेशोत्सव साजरा केला जातो. पण ह्यावर्षी ते न जमल्यामुळे आपल्या मित्र मैत्रिणीच्या घरच्या गणपती नि गौरी चे दर्शन व्हिडिओ द्वारे दाखविण्यात आले.

**_सप्टेंबर १९, २०२०_**

(Virtual) लाईव्ह नाट्यसंगीत कार्यक्रम.
सादरकर्ते - हृषिकेश बडवे,
तबला - श्री.चारुदत्त फडके,
हार्मोनियम - राजीव परांजपे.




**_ऑक्टोबर ३०, २०२०_**

(Virtual) कोजागिरी पौर्णिमा - सर्वांचा आवडता कार्यक्रम अंताक्षरी



**_नोव्हेंबर २२, २०२०_**

दिवाळी धमाका.. स्थानिक कलाकारांचे एकपात्री, वेगवेगळ्या विषयावर एकपात्री कार्यक्रम.
'बसल्या बसल्या स्टॅन्ड अप कॉमेडी' सादरकर्ते कौस्तुभ सोमण.
सभासदांना दिवाळीचा फराळ, मराठी कालनिर्णय, आकाशकंदील घरपोच देण्यात आला.








***डिसेंबर १८,२०२०***

(Virtual) Annual General Body Meeting ला वर्षाचा जमाखर्चाचा अहवाल सादर केला. आणि "आम्हीच सगळ्यात हुशार quiz" मध्ये प्रश्न उत्तरांच्या कार्यक्रमात मटांगे कुटुंबीय विजेते ठरले.




## फ्लोरिडातील कोकण - रेखा आणि रणजित केळुस्कर



सुजाता साठे
ई-मेल: sujatass@hotmail.com

आमच्या कथा क्लबची मीटिंग तीन वर्षांपूर्वी रेखा आणि रणजित केळुसकर ह्याच्या घरी ठरली होती. मीटिंगनंतर रेखाने त्यांनी घराच्या मागे केलेली बाग दाखवली. फ्लोरिडामध्ये बहुतेक सगळ्यांकडेच छान बागा केलेल्या आहेत. पण केळुसकरांची बाग काही वेगळीच होती. इतक्या प्रकारची फुले, फळे असलेली बाग मी प्रथमच पाहिली. आणि तुम्हा सर्वांना त्याबद्दल सांगावे असे वाटले. त्यांच्याशी फोनवर मारलेल्या ह्या गप्पा!

**मी:** 'रेखा, तुम्ही न्यू जर्सीतून फ्लोरिडात कधी आणि कसे आलात?'
**रेखा:** 'आम्ही बऱ्याच वर्षांपूर्वी फ्लोरिडात Disney World बघायला आलो होतो. तिथल्या हॉटेलमध्ये रातराणी लावलेली होती. त्याचा सुगंध मला भारतात घेऊन गेला. इथल्या गरम हवेत वर्षभर फुले आणि फळे येतात हे माझ्या लक्षात आले आणि तेव्हाच मी ठरवले की एक दिवस मी नक्कीच फ्लोरिडात राहायला येईन. पण दोघांच्या नोकऱ्या, मुलाची शिक्षणे ह्यामुळे ते लांबणीवर पडले.'



**रणजित:** 'मला तिथल्या थंडी आणि बर्फ़ाचा फार कंटाळा आला होता. त्यामुळे मी नोकरीतून निवृत्त झाल्यावर फ्लोरिडात जाण्याचे ठरवले. रेखाची बागकामाची आवड हे मुख्य कारण होते. २०१५ च्या एप्रिलमध्ये आम्ही लेक वर्थ फ्लोरिडात घर घेतले. घर घेतांना मोठे बॅकयार्ड पाहिजे ही मुख्य अट होती. त्यामुळे आत्ताचे एक एकर जागा असलेले घर आम्हाला लगेच आवडले.'

रेखाचे आजोळ कोकणातले. तिच्या आईला बागकामाची अतिशय आवड. ती निसर्गात अगदी हरवून जायची. आईकडून हे निसर्गप्रेम रेखात आले. त्यामुळे इथे प्रति कोकण तयार करायचे हे तिचे स्वप्न होते. न्यू जर्सीत सुद्धा तिचे यार्ड मोठे होते. ती भाज्या, फुले लावायची. पण तिथे थंडीमुळे काही महिनेच बागकाम करता यायचे. न्यू जर्सीत त्यांनी ९ कोंबड्या आणि मोरही पाळला होता. तिथे तिच्या बागेत कोल्ह्यांनी शेडखाली घर केले होते. दरवर्षी ते तिथे त्यांची पिल्ले ठेवून जायचे. तसेच पॉसम पण बरेच दिसायचे. एके वर्षी एक काळे अस्वल येऊन त्याने रेखाच्या पेअर्सवर ताव मारला होता. रेखा जुन्या आठवणीत रमली होती.

**मी:** 'रेखा, तुम्ही ह्या बागेचे प्लॅनिंग कसे केलेत? सुरवातीला काही अडचणी आल्या का?'
**रेखा:** 'आम्ही पहिल्यांदा इथल्या घरात आलो तेव्हा पोहोण्याच्या तलावाजवळ फक्त ८ नारळाची झाडे होती. आम्ही नवीन झाडे घरापासून दूर मागच्या बाजूला लावायचे ठरवले.
आम्ही एका excavator ला बोलावून जमीन खणून सारखी सपाट करून घेतली. आम्हाला खूप दिवस न थांबता फळे फुले हवी होती. त्यामुळे आम्ही मध्यम उंचीची किंवा मोठी (mature) झाडे Excalibur Nursery मधून आणली. काही झाडे ऑनलाइन तर काही झाडे पाम बीच काऊंटीच्या Garden Show मधून घेतली.



त्यात फळे, फुले, मसाल्याची झाडे होती. दोनशेच्या वर झाडे झाल्यावर मी मोजायची थांबले!'

**मी:** 'बाप रे! एवढी झाडे विकत घेतलीत तुम्ही? एवढी झाडे लावायची म्हणजे सोपे काम नाही. तुम्ही कोणाची मदत घेतलीत का?'
**रणजीत:** 'तुम्ही रेखाच्या रामा गड्याकडे बघता आहात.'
रणजीत हसत म्हणाला. 'अहो झाडे लावण्याचे काम होतेच. पण त्या सगळ्यांना पाणी घालतांना पाण्याचे बिल दरमहा ४०० डॉलर्स यायला लागले. तेव्हा ह्यावर उपाय म्हणून आम्ही Bore Well खणून घेतली. आणि सहा महिन्यातच आम्हाला त्याचा फायदा दिसू लागला.
**रेखा:** 'आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे फ्लोरिडाच्या मातीत रेती असते. त्यामुळे न्यू जर्सीला भरपूर येणाऱ्या भाज्या इथे येत नाहीत. न्यू जर्सीला माती सुपीक असल्याने टमाटा, मिरची, काकडी, वांगी आणि इतर भाज्या भरपूर यायच्या. इथे भाज्यांसाठी वेगळा लाकडी बॉक्स करून त्यात भाज्या लावल्या तरच येतात.'

**मी:** 'आता रोज किती वेळ बागेत काम करता?'
**रेखा:** 'मी रोज साधारण दोन तास बागेत काम करते. तण काढणे, खते घालणे, पाने गोळा करणे इत्यादी. पण ५-६ वेळा बागेतून फिरून येते. माझ्या बहरलेल्या बागेकडे बघतांना मला खूप आनंद मिळतो आणि मनःशांतीही! कोविडच्या काळात तर माझ्या बागेमुळे माझा ताण खूप कमी झाला.'

**मी:** 'तुझ्या बागेतल्या फळाफुलांची नावे सांगशील का?'
**रेखा:** 'हो जरूर!



**फळझाडे** : काजू (गेल्या वर्षी ३५० काजू आले), चिंच, आवळा, रामफळ, स्टार फ्रुट, लीची, सीताफळ, पपई, पॅशन फ्रुट, आंब्याची ४ झाडे, केळी, नारळ, फणस, अननस, Rambhutan, Loquat, Longon Berry, फ्लोरिडा पीच, आव्हाकाडो. सगळ्या झाडांना भरपूर फळे येतात.



**फुलझाडे**: चाफा (वेगवेगळे ६ रंग आहेत), जास्वंदी वेगवेगळ्या रंगांची, पारिजातक, गोकर्ण, Angel Trumpet, Yesterday-Today-Tomorrow (ह्याला तीन दिवशी तीन वेगवेगळ्या रंगांची फुले येतात), मोगऱ्याच्या वेगवेगळ्या जाती, हिरवा चाफा, सोनचाफा, सोनटक्का, वेगवेगळी orchids, कर्दळी, बॉटलब्रश, कृष्णकमळ, मधुमालती, रातराणी, झेंडू, गुलमोहोर, गुलाब, ब्रम्हकमळ

**भाज्या व मसाले:** मोरिंगा, अळू, तूर, Tree Spinach, Thai Basel, Cuban oregano, रोझमेरी, chives, पुदिना, allspice, कढीपत्ता, तमालपत्र'

मला तर नुसती नावे वाचूनच दमायला झाले! आणि ही नुसती नावे नाहीत. त्या सर्व झाडांना भरपूर फळे आणि फुलेही येतात. त्यांच्या बागेचे फोटो खाली आहेत. ते बघून तुमची खात्री पटेल.

**मी:** 'तुमच्या बागेत कुठले पक्षी व प्राणी तुम्हाला दिसतात?'
**रणजीत:** 'पहिल्या वर्षी आम्हाला एक फारच वेगळा प्राणी बघायला मिळाला, Armadillo. आमच्या बागेत हा प्राणी बघणे ही आमच्यासाठी पर्वणीच होती. तेव्हा जवळ कॅमेरा नव्हता म्हणून फोटो काढता आला नाही. एक ससापण नेहेमी यायचा. एक दिवस बरोबर त्याची
मैत्रीणही घेऊन आला होता. हल्ली बरेच दिवस दिसला नाही. आम्ही इथे राहायला आल्यावर दुसऱ्या वर्षी एका Hawk पक्षाने आमच्या पाईनच्या झाडात घरटे केले. तीन वर्षे तो तिथे होता. ह्या वर्षी The great horned owl च्या जोडप्याने Hawk पक्षाला हाकलून त्यांच्या घरट्याचा ताबा घेतला. आता लवकरच आम्हाला त्यांची पिल्ले बघायला मिळतील.'
**रेखा:** 'शिवाय migratory hummingbirds दरवर्षी दिसतात. इथेच राहणारे ब्लू जे, कार्डिनल्स, मॉकिन्ग बर्डस, वॉटर बर्ड्सही नेहेमी दिसतात. एका ब्लॅक रेसर जातीच्या सापाचे बीळ आम्ही बुजवल्याने तो आता दिसत नाही. माझ्या बर्ड फीडरवर पेंटेड बंटिंग्स दिसतात. तसेच मला रोज स्वयंपाकासाठी नारळ लागतो. उरलेला नारळ मी खारींसाठी बाहेर ठेवते.





कधीतरी नारळ ठेवायला उशीर झाला तर त्या मागच्या दाराजवळ येऊन नारळासाठी थांबलेल्या असतात. अशी मजा! कधी कधी नारळाच्या झाडावर एक रॅकून चढून बसतो आणि मी तिथून जाण्याची वाट बघतो. म्हणजे त्याला पळून जाता येईल!'

**मी:** 'एवढे कष्ट केल्यावर तुझे बागेचे स्वप्न पूर्ण झाले असे तुला वाटते का?'
**रेखा:** 'नक्कीच! मला माझ्या बागेकडे बघून जो आनंद मिळतो तो शब्दात नाही सांगता येणार!'

**मी:** ' नवीन बाग करू इच्छिणाऱ्या लोकांना काय सल्ला देशील?'
**रेखा:** 'हळू सुरवात करा आणि नीट प्लॅन करा. आमच्या उत्साहाच्या भरात आम्ही जागा दिसेल तिथे झाडे लावली आणि मग योग्य जागी हलवली. आणि एक लक्षात ठेवा की मोठ्या प्रमाणात बाग करायची तर खर्चाचे काम आहे. पण त्यामुळे मिळणारे समाधान आणि आनंद हे खूप मोठे बक्षीस आहे!'





रेखा आणि रणजीत ह्याच्या बागेचे फोटो खाली दिले आहेत. रेखा तिच्या बागेतली फळे सर्व मैत्रिणींना नेहेमीच भरपूर देत असते. शिवाय कोणी मागितले तर रोपे करून देणे, झाडांच्या बिया देणे हेही आनंदाने करते. रेखा खूप आर्टिस्टिक आहे. त्यांनी बागेत केलेले तुळशी वृन्दावन आणि जपानी पद्धतीची कमान बघण्यासारखी आहे. घरची फुले वापरून तिने दसऱ्याच्या देवीच्या पूजेला किती सुंदर डिझाईन केले होते ते फोटो बघून लक्षात येईल. तर ह्या निसर्गवेड्या केळुसकर दांपत्याची बाग अशीच फळाफुलांनी बहरत राहो ही ईच्छा!



















तुम्हा सर्वांना
मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा

## Disclaimer

"The views and opinions expressed in the various articles in "Darpan" are those of the individual authors and contributors. Darpan is the product of many people's creativity and willingness to share their thoughts with the rest of us. This is not a sponsored publication. The writing is mostly spontaneous, unrevised and with only minor editing. The editor is thankful for the authors' contribution but makes no representation to the accuracy of any information and will not be responsible for any errors or omissions."

Contact: Manjusha Naik
Email: president@mmosf.org

धन्यवाद!